नि.दि.दावा क्रं. १२/२०२२
श्रीराम वि. हरिदास
नि.क्रं. २४

**प्रतिवादीतर्फे उलटतपास वकिल श्री. बी. जी. खोब्रागडे यांच्याद्वारे शपथेवर सुरु –**

**५.** हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी यांनी माझ्या व माझ्या सहकार्याविरोधात सदर न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्रंमाक ९१/२०१२ दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी दिवाणी दावा क्रंमाक ९१/२०१२ हा मी व माझ्या सहकार्यानी खरेदी प्रत करुन दयावे या तोषिश कामी दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दिवाणी दावा खारिज करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, नियमित दिवाणी दावा क्रंमाक ९१/२०१२ खारिज करण्यात आला म्हणून त्या दाव्यातील वादींनी जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, अपील ही खारिज करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, जिल्हा न्यायालयाने अपील खारिज केल्यानंतर या दाव्यातील प्रतिवादींनी उच्च न्यायालयात दुसरे अपील दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, उच्च न्यायालयात दाखल दुसरे अपील मध्ये माझ्या वतीने वकील श्री. पी. के. मिश्रा यांनी वकील पत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजही दुसरे अपील उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, मी नागपूर येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्रंमाक १ हे देखील नागपूर येथेच राहतात. हे म्हणणे खरे आहे की, पारर्डी गावात माझे राहते घर नाही. सदर दाव्यातील दावा मिळकतीचा सव्र्हे क्रंमाक ५४४७ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझ्या सहकार्यानी चराई करिता शेती प्रतिवादींना दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या शेतीवर १९९६ पासून प्रतिवादींचा ताबा आहे.

**७.** प्रश्न – सध्या शेतीवर कोणाचा ताबा आहे

उत्तर – प्रतिवादींनी जबरदस्तीने शेताचा ताबा घेतला आहे.

**८.** हे म्हणणे खरे आहे की, आजही शेतावर प्रतिवादी यांच्याच ताबा आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेताचा ताबा मिळणेकामी सन १९९६ पासून ते आजतयागत या दाव्या व्यतिरिक्त इतर कोणताही दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या सहकार्यानी दावा मिळकत प्रतिवादी यांना विक्री केली आहे त्यामुळेच दावा मिळकतीचा ताबा मिळणेकामी आम्ही सन १९९६ पासून या दाव्या व्यतिरिक्त कोणताही दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे

खरे नाही की माझे निशाणी क्रमांक २४ वरील पुरावेचे शपथपत्र चुक व खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
मौदा.
दिनांक ०१.०८.२०२५

समक्ष
**स्वाक्षरी/-**
(एल.एम. पठाण)
दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,
मौदा